**प्रेस नोट**

दिनांक : ०४/११/२०२०

**रक्कम रु. ५० लाखापुढील थकबाकी संदर्भात थकबाकीदारांवर केली कारवाई**

विषय: **अभय योजना सुरु झाल्यापासून ५५,९३३ इतक्या मिळकतधारकांनी जमा केले रक्कम रु.१३६.६२ कोटी मिळकत कर. सवलत दिली रक्कम रु.६४.८४ कोटी.**

**६,४०,७४२ इतक्या मिळकतधारकांनी एकूण रक्कम रु.९८४.७१कोटी मिळकतकर जमा केला.**

- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे १०.६१ लक्ष इतक्या मिळकती आहेत. अनेक मिळकतधारकांनी विविध कारणांमुळे वेळेवर मिळकतकर न भरल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार दरमहा २% शास्ती लावण्यात आलेली आहे. ही शास्ती दरमहा २% असल्यामुळे ती वाढत जावून थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. कोरोना विषाणूच्या जागतिक महामारीच्या साथीच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता कर भरणे सुलभ व्हावे, याकरिता पुणे महानगरपालिकेने **दिनांक ०२/१०/२०२० ते ३०/११/२०२०** या कालावधीमध्ये अभय योजना राबविणे बाबतचा ठराव दिनांक ०१/१०/२०२० रोजी पारित केलेला आहे.

- सदर ठरावाप्रमाणे दिनांक **०२/१०/२०२० ते ०४/११/२०२०** या ३४ **दिवसांमध्ये ५५,९३३ इतक्या थकबाकीदारांनी १३६.६२ कोटी इतका** मिळकतकर महानगरपालिकेस जमा केलेला आहे. त्यामुळे **रक्कम रु. ६४.८४ कोटी इतकी** सवलत देण्यात आली आहे.

- **५० लाखा पुढील ज्या थकबाकीदारांनी थकबाकीची रक्कम भरलेली नाही, अशा थकबाकीदारांवर पुणे महानगरपालिकेतर्फे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये आज दिनांक ०४/११/२०२० रोजी कोथरूड येथील दौलत को.ऑप.हौ.सोसायटी वर सन २००३ पासून थकीत रक्कम रु.७४,६६,०००/- च्या मागणीसाठी कारवाई करण्यात आलेली असून, सदर मिळकत सीलबंद करण्यात आली आहे. तसेच शहरात इतर कार्यक्षेत्रात देखील कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. काही ठिकाणी थकबाकी दारांनी पुढील १-२ दिवसात थकबाकी रक्कम जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. तरी, वारंवार नोटीस बजावूनही थकबाकीदारांनी थकीत मिळकतकर जमा न केल्यास, अशा सर्व मिळकतीवर/ थकबाकीदारांवर दैनंदिन कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तरी उर्वरित कालावधीमध्ये थकबाकीदारांनी जास्तीत जास्त या सवलतीचा लाभ घेवून, पुणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे, आवाहन करण्यात येत आहे.**

- **दिनांक ०१/१२/२०२० पासून सदर थकबाकीवर शास्ती लागू होणार आहे. त्यामुळे अभय योजनेमुळे मिळणारा लाभ कमी होण्याची शक्यता आहे. तरी ३० नोव्हेंबर २०२० पूर्वी थकबाकी भरण्याची व्यवस्था करावी.**

Scanned with CamScanner

- **दिनांक ०१/०४/२०२० ते ०४/११/२०२० अखेर ६,४०,७४२ इतक्या मिळकतधारकांनी एकूण रक्कम रु. ९८४.७१ कोटी मिळकत कर पुणे महानगरपालिकेकडे जमा केला आहे.**

- मालमत्ता कर भरणे सुलभ व्हावे, म्हणून पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील जवळच्या नागरी सुविधा केंद्रावर रोख व धनादेशाद्वारे कर भरू इच्छिणाऱ्या मिळकत धारकांची सोय व्हावी यासाठी **सुट्टीच्या दिवशी देखील सर्व नागरी सुविधा केंद्र सुरु ठेवण्यात आली असून, सदर नागरी सुविधा केंद्र सोमवार ते शनिवार सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० पर्यत सुरु ठेवण्यात आलेले आहे. तथापि, रविवार दिनांक ०८/११/२०२० रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० नागरी सुविधा केंद्र सुरु राहणार आहेत. तरी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी.**

- नागरिकांनी नागरी सुविधा केंद्रावर गर्दी होणार नाही, फार काळ थांबावे लागणार नाही याची दक्षता घेवून सहकार्य करणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.

- **तथापि, नागरी सुविधा केंद्र सुरु राहणार असले तरी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होवू नये, या करिता नागरिकांनी जास्तीत जास्त online प्रणालीद्वारे "propertytax.punecorporation.org" या संकेतस्थळावरून मालमत्ता कर भरणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.**

०८/११/२०

(विलास कानडे)
सह महापालिका आयुक्त
कर आकारणी व कर संकलन
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner